पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक ५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २१/४/२००९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. ४०**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १५/११/२००८ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १४/३/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/१० दि. ८/४/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १५,११,२७३/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ४१**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २२/११/२००८ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २१/३/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/२० दि. ९/४/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ८,८८,६४४/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ४२**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २९/११/२००८ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २८/३/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/२१ दि. ९/४/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ४७,९९,४६३/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्रं. ४३**

दि. ६/४/२००९ ते दि. १२/४/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ८४ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/१३ दि. १६/४/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्रं. ४४**

आयातकर कार्यालयाकडील पक्क्या पासाची सन २००७-०८ व २००८-०९ मधील हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/१८ दि. ८/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ४ सन २००९-२०१० चा विचारासाठी.

**विषय क्रं. ४५**

करआकारणी व करसंकलन खात्याकडील बिबवेवाडी पेठ विभागाच्या सन १९९८-९९ ते २००३-०४ मधील ठरावबंदाची तपासणी व सन २००४-०५ ते २००८-०९ अखेर संगणकावरील कराच्या मागणीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/२४ दि. ९/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ५ सन २००९-२०१० चा विचारासाठी.

UnRegistered

**विषय क्रं. ४६**

मा.उप आयुक्त(विशेष) यांचे नियंत्रणाखालील परवाना व आकाशचिन्ह विभागाच्या १) पेठ–कोंढवा २) पेठ–भवानी टिंबर मार्केट ३) पेठ–मुंढवा ४) पेठ–गंज ५) पेठ–गुलटेकडी (भाग १ ते भाग ५) ६) पेठ–वानवडी ७) पेठ–रविवार ८) पेठ–सदाशिव (भाग १ ते भाग ५) ९) पेठ–घोरपडे या पेठांमधील सन १९९५–९६ ते २००७–०८ या कालावधीत वसूल केलेल्या परमीट शुल्क आकारांची परमीट फी चे नोंदणीपुस्तक, किर्द, रकमांची चलने व तदनुषंगिक उपलब्ध कागदपत्राधारे तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/३० दि. १३/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ६ सन २००९–२०१० चा विचारासाठी.

**टेंडर न मागविता**

**विषय क्रं. ४७**

पुणे मनपाच्या नगर अभियंता खात्याकडील दाखल होणाऱ्या बांधकाम प्रस्तावांच्या छाननीकरीता तयार केलेले Autodcr ह्या संगणक प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी मा.महा.आयुक्त यांच्या पत्रात नमूद केलेल्या एकूण ५०० Digital Signature N code solutions, GNFC उपकंपनी, यांचेकडून र.रुपये ८,२५,०००/– पर्यंत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम कलम ५.२.२ अन्वये खरेदी करण्याकरीता आणि अनुषंगाने आवश्यक तो करारनामा संबंधितांशी करणेस मान्यता मिळणेबाबत खरेदी करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/८ दि. ९/४/२००९ चे पत्र.

(टिप :– सदर कंपनी ही गुजरात, नर्मदा व्हॅलीफर्टीलायझर या सरकारी कंपनीची उपशाखा आहे.)

**मागील सभेचे विषय**

**विषय क्रं. ४८**

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्याकडील सेवकांना गणवेश कापड महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून खालील चारही ॲटमची मिळून एकूण र.रुपये २७,९६,४५०/– (सर्व करांसह) खरेदी करणेस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे शेड्युल चॅप्टर ५(२)(२) चे अन्वये मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(तां)कोठी/१५२८ दि. २४/३/२००९ चे पत्र.

| अ.क्र. | मालाचे वर्णन | परिमाण | प्रति मिटर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | खाकी कापड (टेरिकॉट कापड)<br>७०% पॉलिस्टर, ३०% व्हिस्कॉस, पन्हा १४७ सेमी | १०,००० मिटर | १४४/– | १४,४०,०००/– |
| २ | पांढरे कापड (टेरिकॉट कापड)<br>७०% पॉलिस्टर, ३०% व्हिस्कॉस, पन्हा १४७ सेमी | १,२०० मिटर | १४४/– | १,७२,८००/– |
| ३ | निळे कापड (टेरिकॉट कापड)<br>७०% पॉलिस्टर, ३०% व्हिस्कॉस, पन्हा १४७ सेमी | ६०० मिटर | १४४/– | ८६,४००/– |
| ४ | खाकी कापड (डिलक्स कापड)<br>७०% पॉलिस्टर, ३०% व्हिस्कॉस, पन्हा १४७ सेमी<br>चतुर्थश्रेणी सेवकांसाठी<br>सोबत शासनाने दिलेल्या नमून्याप्रमाणे व टेस्टिंग रिपोर्टप्रमाणे मालाचा पुरवठा करावा. | १०,५०० मिटर | १०४=५० | १०,९७,२५०/– |
| | एकूण र.रुपये | | | २७,९६,४५०/– |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १५/४/२००९ च्या सभेत ठरले होते.)

Unregistered

**विषय क्र. ४९**

पुणे पेठ एरंडवणा फा.प्लॉट नं. ७६अ प्रभाग क्र. २९ लॉ कॉलेज रस्ता, शांतीशिला भागात मनपामार्फत बांधणेत आलेला जिम्नॅशियम हॉल व अभ्यासिका क्षेत्रफळ २४७.७७ चौ.मी. चे मा.नगर उपअभियंता(मुल्यांकन विभागाकडून मासिक भाडे र.रुपये ११,९५९/– प्रथम वर्षासाठी व प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ निश्चित केल्यानुसार ५ वर्षे कालावधीसाठी सदरची जागा भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी मनपाच्या अपेक्षित रकमेपेक्षा सर्वात जास्त मासिक भाडे र.रुपये १२,१५०/– देऊ करणारे ठेकेदार मे.सोमेश्वर फौंडेशन, स.नं. १९, सोमेश्वरवाडी, पाषाण, पुणे ८ यांची रक्कम स्विकारुन ताबा दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी भाडे तत्वावर चालविणेस देणेस, मासिक भाडे रकमेत प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करणेस, त्याकरीता त्यांचेशी आवश्यक तो करारनामा करणेस तसेच मनपाचे येणारे सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळच्या वेळी भरणेस व ताबा देणेपुर्वी ६ महिन्याचे मासिक भाडे रक्कम अनामत म्हणून व ३ महिन्याचे मासिक भाडे रक्कम आगाऊ स्विकारणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूजिं)/१४३९ दि. २०/२/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १५/४/२००९ च्या सभेत ठरले होते.)

सुनिल पारखी
उपनगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

UnRegistered